**<u>ठळक बातम्या</u>**

- नक्षलवादी चळवळीतला वरिष्ठ नेता भूपतीचं गडचिरोलीत आत्मसमर्पण, देशातल्या नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या १८ वरुन ११ पर्यंत घसरली

- माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांना दिली जाणारी आर्थिक मदतीची रक्कम दुप्पट करण्याचा संरक्षण मंत्रालयाचा निर्णय

- बिहार विधानसभा निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षांकडून उमेदवार यादी जाहीर

- ज्येष्ठ तेलगु अभिनेत्री-गायिका रावु बालसरस्वती देवी यांचं निधन

**आणि**

- पाकिस्ताननं केलेली शस्त्रसंधीची विनंती अफगाणिस्तानकडून मान्य

**<><><><><>**

नक्षल चळवळीतला मोठा नेता, माओवाद्यांची केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोचा सदस्य असलेला मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती याच्यासह ६१ नक्षलवाद्यांनी आज गडचिरोलीत आत्मसमर्पण केलं. भूपतीचं आत्मसमर्पण हा नक्षली चळवळीसाठी मोठा धक्का असल्याचं मानलं जातंय. यामुळं राज्यातला नक्षलवाद संपल्यात जमा असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

कॅप्सूल

*(काही महिन्यांपूर्वी भूपतीची पत्नी ताराक्का हिनं गडचिरोलीत शस्त्र टाकली होती. तेव्हाचं भूपतीही शरण येणार हे संकेत मिळाले होते. गेल्या काही दिवसांपासून भूपती आणि त्याच्या सहकाऱ्यांशी शरणागतीसंबंधी चर्चा सुरू होत्या. मुख्यमंत्र्यांच्या समोरच शरणागती पत्करणार ही त्याची अट सरकारनं आज मान्य केली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस संविधानाची प्रत देऊन कायद्याच्या मार्ग*

*स्वीकारल्याबद्दल आत्मसमर्पित नक्षलवाद्यांचं स्वागत केलं. भूपतीवर विविध राज्यात मिळून साडे ५ कोटी रुपयांहून अधिक बक्षिस होतं. उत्तर गडचिरोली पाठोपाठ दक्षिण गडचिरोलीतला नक्षलवाद संपुष्टात आणण्याच्या दिशेनं टाकलेलं हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.*

***होल्ड - मुख्यमंत्री बाइट***

*आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांचं उत्तम पुनर्वसन करण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं. फेब्रुवारी महिन्यात आत्मसमर्पण केलेल्या दोन नक्षलवाद्यांना पुनर्वसनासाठी प्रातिनिधिक स्वरुपात प्रत्येकी अडीच लाख रुपयांचे धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आले. आत्मसमर्पण न करणाऱ्यांना गंभीर परिणामांना सामोरं जावं लागेल असा इशाराही फडनवीस यांनी चळवळीतल्या नक्षलवाद्यांना दिला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली पोलिस दलाला एक कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं. )*

**<><><><><>**

छत्तीसगडमधे सुकमा इथं ५० लाखांचं बक्षीस लागलेल्या २७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यात पीएलजीए बटालियन क्रमांक १ मधे सक्रीय असलेल्या २ कट्टर माओवाद्यांचा समावेश असल्याचं सुकमाच्या पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशातल्या नक्षलवादाचा अतिप्रभाव असलेल्या जिल्ह्यांची संख्या ३ पर्यंत कमी झाली आहे. तर एकूण नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या १८ वरुन ११ पर्यंत घसरली आहे, असं केंद्रीय गृहमंत्रालयानं सांगितलं आहे.

सध्या छत्तीसगडमधल्या बिजापूर, सुकमा आणि नारायणपूरमध्ये मोठ्या प्रमाणात नक्षलवादी आहेत. २०१३ मध्ये देशातल्या १२६ जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद्यांचा प्रभाव होता. यंदाच्या मार्चमध्ये ही संख्या १८ पर्यंत, आणि आता ११ पर्यंत कमी झाली आहे. येत्या ३१ मार्चपर्यंत देशाला नक्षलवादमुक्त करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. यंदाच्या वर्षात सीपीआय माओवादी पक्षाचा सरचिटणीस, तसंच पॉलिट ब्युरो आणि केंद्रीय समितीचे ८ सदस्य यांच्यासह ३१२ नक्षलवादी विविध ठिकाणी चकमकीत मारले गेले. ८३६ जणांना अटक झाली, तर सोळाशेहून अधिक

नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. यामुळं गेल्या अनेक वर्षातले विक्रम मोडीत निघाले आहेत.

**<><><><><>**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या सदस्यांना आता त्यांच्या पीएफ खात्यातली रक्कम लग्न, घर खरेदी यासारख्या कारणासाठी अवघ्या एक वर्षात काढता येणार आहे. यापूर्वी यासाठी ५-७ वर्ष थांबावं लागत होतं. शिक्षण आणि आजारपणासाठी पीएफमधली रक्कम काढणंही आता सोपं झालंय. तसंच विशेष संकटाच्या परिस्थिती पीएफमधली शिल्लक रक्कम वर्षातून २ वेळा काढता येईल अशी माहिती केंद्रीय श्रम आणि रोजगारमंत्री मनसुख मांडवीय यांनी दिली आहे. नोकरी सुटल्यावर कर्मचाऱ्यांना लगेच ७५ टक्के रक्कम काढता येईल, उर्वरित रक्कम एक वर्ष झाल्यावर काढता येईल. यापूर्वी पीएफमधून वारंवार पैसे काढून घेणाऱ्यांना निवृत्तीवेतनासाठीची १० वर्षांची अट पूर्ण करता येत नव्हती. आता यात सुधारणा करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

माजी सैनिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीची रक्कम दुप्पट करण्याच्या निर्णयाला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी मंजुरी दिली आहे. निवृत्तीवेतन न मिळणाऱ्या वयोवृद्ध माजी सैनिकांना किंवा त्यांच्या विनाउत्पन्न विधवांना माजी सैनिक कल्याण विभागातर्फे देण्यात येणारं दरमहा ४ हजार रुपयांचं अनुदान वाढवून आता आठ हजार करण्यात आलं आहे. त्याचप्रमाणे मुलांच्या शिक्षण आणि लग्नासाठी देण्यात येणारं अनुदानही दुप्पट झालं आहे. येत्या १ नोव्हेंबरनंतर केलेल्या अर्जासाठी हा निर्णय लागू असेल, असं संरक्षण मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षांनी आज उमेदवार यादी जाहीर केल्या.

संयुक्त जनता दलानं ५७ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. यात अनेक मंत्री आणि विद्यमान आमदारांचा समावेश आहे. ग्रामविकास मंत्री श्रवण कुमार नालंदा मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत, तर वरिष्ठ नेते विजय कुमार चौधरी सराईरंजन मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत. समाजकल्याण मंत्री मदन साहनी आणि शिक्षण मंत्री सुनील कुमार हेही पुन्हा एकदा मैदानात उतरले आहेत. उमेश कुशवाह, महेश्वर हजारी, अश्वमेध देवी या वरिष्ठ नेत्यांनाही जदयूने पुन्हा एकदा उमेदवारी दिली आहे.

तर लोकजनशक्ती पक्ष रामविलासनं आपल्या १४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. यात राजू तिवारी, संजय कुमार सिंह, विष्णु देव पासवान, सीमंत मृणाल, सुरेंद्र कुमार, संजय कुमार आणि बाबुलाल शौर्य यांचा समावेश आहे. भाजपानेही आज बारा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. यात गायक मैथिली ठाकूर अलीनगर मतदारसंघातून निवडणूक लढणार असून माजी सनदी अधिकारी आनंद मिश्रा बक्सर मतदारसंघातून मैदानात आहेत.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बुथस्तरावरच्या कार्यकर्त्यांशी नमो ॲपच्या माध्यमातून संवाद साधला. रालोआसाठी एकत्रित काम करण्याचं आवाहन यावेळी मोदी यांनी केलं. संयुक्त जनता दल,

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेत्री आणि तेलुगु चित्रपटसृष्टीतल्या पहिल्या पार्श्वगायिका रावु बालसरस्वती देवी यांचं हैदराबाद इथं निधन झालं त्या ९७ वर्षांच्या होत्या. बालकलाकार म्हणून त्यांनी काम सुरु केलं. १९४३ मधे भाग्यलक्ष्मी या चित्रपटात

अभिनेत्री कमला कोटणीस यांच्यासाठी त्यांनी पहिल्यांदा पार्श्वगायन केलं. अभिनेत्री आणि गायिका म्हणून अनेक चित्रपटांमधे त्यांनी योगदान दिलं. आकाशवाणीच्या त्या पहिल्या सुगम संगीत गायिका होत्या.

**<><><><><>**

महाभारत या लोकप्रिय मालिकेत कर्ण ही भूमिका साकारणारे अभिनेता पंकज धीर यांचं कर्करोगानं निधन झालं. ते ६८ वर्षांचे होते. धीर यांच्या पार्थिव देहावर आज दुपारी मुंबईत पवन हंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. १९८८मध्ये बी. आर. चोप्रा यांच्या महाभारत या दूरचित्रवाणी मालिकेत साकारलेल्या कर्ण या भूमिकेमुळे पंकज धीर प्रकाशझोतात आले होते.

**<><><><><>**

पाकिस्तानच्या विनंतीवरून अफगाणिस्ताननं शस्त्रसंधी करायला संमती दिली आहे. तालिबानचे प्रवक्ते झबिनुल्ला मुजाहिद यांनी या वृत्ताला दुजोरा दिला.

पाकिस्ताननं आज सकाळी पुन्हा एकदा अफगाणिस्तानच्या स्पिन बोलडक भागात हल्ला केला. त्यात १२ अफगाणी नागरिक ठार, तर १०० पेक्षा जास्त जखमी झाले. प्रत्युत्तरादाखल अफगाणिस्तानच्या सशस्त्र दलांनी अनेक पाकिस्तानी जवानांना ठार केलं. तसंच त्यांची ठाणी, शस्त्रास्त्रं आणि रणगाडे ताब्यात घेतल्याचा दावा तालिबाननं केला. या हिंसाचाराबद्दल संयुक्त राष्ट्रांनी चिंता व्यक्त केली होती.

**<><><><><>**

२०३० मधल्या राष्ट्रकूल स्पर्धा अमदाबादमध्ये होणार आहे. भारतानं यासंदर्भात सादर केलेल्या प्रस्तावाला राष्ट्रकूल संघटनेनं मान्यता दिल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिली आहे.

**<><><><><>**

ब्राझीलचे उपाध्यक्ष आणि विकास, व्यापार आणि सेवा मंत्री जेराल्ड अलक्मीन आजपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याबरोबर ते उद्या व्यापार मंत्रीस्तरीय आढावा बैठकीत सहभागी होतील.

**//<><><><><>//**